# प्रकरण – एक

# अभ्यासाची भूमिका

## प्रकरण – एक

# अभ्यासाची भूमिका

०१. अभ्यास विषयाचे प्रयोजन व महत्त्व

०२. अभ्यासाची ध्येये आणि उद्दिष्टे

०३. संशोधन पध्दती व तंत्र

०४. संशोधनाची व्याप्ती

## प्रकरण – एक

# अभ्यासाची भूमिका

### ०१. विषयाचे प्रयोजन व महत्त्व –

वाचकांची वाचनविषयक आस्था आणि आवड सातत्याने टिकवून धरणारा कादंबरी हा लोकप्रिय वाङ्‌मय प्रकार आहे. अनेक शतकांची परंपरा असलेल्या या कथात्मक वाङ्‌मय प्रकाराची मला एम.ए. चा अभ्यास करीत असतानच आवड निर्माण झाली. पुढे शिक्षकी पेशात आल्यानंतर तर या वाङ्‌मय प्रकाराशी अगदीच जवळून संबंध आला. कादंबरीचे अध्यापन करीत असताना तिच्या विविधांगी रूपांची अधिकाधिक विस्तृत ओळख होत गेली आणि पुढे कधी संशोधनाचा योग आलाच तर त्यासाठी कादंबरी हाच वाङ्‌मय प्रकार निवडण्याचे मी मनोमन निश्‍चित केले.

पीएच्.डी. च्या संशोधनाच्या निमित्ताने मला ही संधी मिळते याचा आनंद वाटतो आहे. मी स्वत: ग्रामीण भागात राहते. त्यामुळे ग्रामीण जीवनातील रूढी, परंपरा, चालीरिती यांच्याशी माझ्या जवळून संबंध आला आहे. आजच्या ग्रामीण कादंबरीने याही ग्रामजीवनाला आपल्यात सामावून घेतले आहे. मी जे ग्रामजीवन अनुभवले, अनुभवते आहे. तेच त्यातून प्रतिबिंबित होताना दिसते. त्यामुळे त्या अनुभव विश्‍वाशी मी सहजपणे एकरूप झाले.

माझ्या आजवरच्या अभ्यासातून व वाचनातून ग्रामीण कादंबरीकडे बघण्याचा माझा एक विशिष्ट असा दृष्टिकोन तयार झाला. हा कदाचित माझा स्वत:चाही मूल्याधिष्ठित दृष्टिकोन असू शकेल. पण या दृष्टिकोनातून मी जेव्हा ग्रामीण कादंबऱ्यांचा अधिक सूक्ष्मपणे अभ्यास करू लागले. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, ग्रामीण कादंबरीचे आशयविश्‍व व्यापक आणि सार्वत्रिक असले तरी विशिष्ट अशा प्रादेशिकतेमुळे अशा कादंबऱ्यात मुलभूत स्तरभेद निर्माण झालेले आहेत, असे लक्षात आल्यानंतर तर माझा हा दृष्टिकोन अधिक डोळस बनला.

मी याच भूमिकेतून वेगवेगळ्या प्रदेशातील ग्रामीण कादंबऱ्यांचे परिक्षण केल्यानंतर तर माझ्या या दृष्टिकोनाला अधिक बळकटी येत गेली. ग्रामीण जीवन सार्वत्रिक असले तरी विशिष्ट असा भौगोलिक परिसराने त्याला स्वत:चे स्वतंत्र असे रूप दिलेले असते. त्यामुळे त्यात स्तरभेद निर्माण झालेले असतात आणि ते स्वत: तेथील प्रादेशिक वैशिष्टयांशी निगडीत आहे. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा असतो असे आपण मानतो. साहजिकच प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये ग्रामजीवनाची सार्वत्रिकता सतत असली तरी ती केवळ वरवरची असते. त्यात भौगोलिक वैशिष्टयांमुळे स्तरभेद पडलेले असतात. हे स्तरभेद भाषा, लोकजीवन, रूढी, परंपरा, धारणा, जाणिवा, व्यवसाय असे विविधांगी असतात. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये त्यांचे स्वच्छ, स्पष्ट प्रतिबिंब पडलेले ठळकपणे दिसून येते. प्रादेशिक कादंबऱ्यांमध्ये साम्य – भेद कोणते याचा अधिक बारकाईने व सखोलपणे शोध घेता यावा या उद्देशाने "मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास" हा संशोधन विषय निश्चित केला आहे.

## ०२. अभ्यासाची ध्येये आणि उद्दिष्ट –

"मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास" हा विषय पुढील उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून अभ्यास केलेला आहे.

१. प्रादेशिक कादंबऱ्यांचे स्वरूप, संकल्पना, वेगळेपण विचारात घेत असतानाच त्यांचा विकासात्मक आढावा घेणे, प्रादेशिक कादंबऱ्यांची जडणघडण आणि विकास होत असताना काही प्रवृत्ती स्थिरावल्या काय आणि त्याचा प्रभाव पढील कादंबरी लेखनावर होत आहे याचा शोध घेतला आहे.

२. या अभ्यासासाठी काही सूत्रे आधारभूत धरली आहेत. अशी सूत्रे निखालपणे सर्वसमावेशक असत नाहीत, हे खरे असले तरीही अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने तसे करणे अपरिहार्यही ठरते.

त्यादृष्टीने येथे महाराष्ट्राच्या भौगोलिक परिसीमा विचारात घेऊन (गोमंतक, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा) प्रत्येक विभागातील दोन याप्रमाणे एकूण दहा कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडलेल्या आहेत. त्यात लेखकाबरोबरच विषयाच्या आणि भौगोलिक परिसराच्याही बाबतीत वेगळेपण राखण्याचा प्रयत्न केलेला आहे.

३. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील प्रादेशिक कादंबऱ्यांचा हा तौलनिक आढावा असला तरी या काळातल्या सर्वच कादंबऱ्या आणि कादंबरीकार यांचा सर्वांगीण विचार करणे येथे प्रस्तुत ठरणार नाही. ही मर्यादा विचारात घेऊन प्रस्तुत कालखंडातील निवडक कादंबरीकार व त्यांच्या वाङ्‌मयीन दृष्ट्या सरस अशाच कादंबऱ्या येथे अभ्यासासाठी निवडल्या आहेत. अर्थात आवश्यक त्या ठिकाणी त्याच्या समकालीन कादंबरीकारांच्या कादंबरी लेखनाचा पुरक संदर्भही विचारात घेतलेला आहे.

४. हा अभ्यास करताना प्रादेशिकतेच्या वेगवेगळ्या प्रवाहांचा आणि प्रकारांचा शोध घेणे, विशिष्ट घटितांना व घटनांना वेगळे काढून त्यांची चिकित्सा करणे, त्यातून काही वैशिष्टयपूर्ण संकल्पना हाती लागतात ते पाहणे, या गोष्टींचे भान ठेवलेले आहे.

५. प्रादेशिक कादंबऱ्यांचा हा चिकित्सक अभ्यास करीत असताना पुढील काही ठळक वैशिष्टये गृहीत धरलेली आहेत.

१. प्रादेशिक कादंबऱ्यांमगील लेखन प्रेरणा.

२. प्रादेशिक कादंबऱ्यांतून हाताळण्यात आलेले विषय.

३. प्रादेशिक कादंबरीच्या लेखनतंत्राविषयक झालेले प्रयोग

४. प्रादेशिक कादंबऱ्यांचे ठळक वेगळेपण.

५. प्रादेशिक कादंबऱ्यांचे सामर्थ्य व मर्यादा.

या सुत्रांच्या अनुरोधाने प्रादेशिक कादंबऱ्यांचा हा तौलनिक अभ्यास केला आहे. त्याच्या आधारे प्रादेशिक कादंबऱ्यांचा प्रवाह समजून घेणे व तिच्या भविष्यासंबंधी काही अटकळ बांधता येते का याचाही शोध घेतला आहे. प्रादेशिक कादंबऱ्यांचे स्वतंत्र रूप विचारात घेण्याच्या दृष्टीने हा अभ्यास उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा आहे.

## ०३. संशोधन पध्दती व तंत्र –

"मराठीतील प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास" हा स्थूलमानाने पुढीलप्रमाणे केला आहे.

१. प्रादेशिक कादंबरीची संकल्पना, स्वरूप व विकासात्मक वाटचाल अधोरेखित केला आहे.

२. अभ्यासासाठी निवडलेल्या कादंबऱ्यांचे आशय निष्ठ गटात वर्गीकरण करून प्रादेशिक या मध्यवर्ती धारेच्या पार्श्वभूमीवर त्या कादंबऱ्यांचा आकलन आणि मूल्यमापन या अनुषंगाने चिकित्सक आढावा घेतला आहे.

३. प्रादेशिक कादंबऱ्यांचा हा मुखत: तौलनिक अभ्यास आहे. कथानक, व्यक्तिरेखाटन, भाषाशैली, रचना व निवेदन या अनुषंगाने ह्या कादंबऱ्यांचे मुल्यमापन करून त्यातील प्रादेशिक वेगळेपण विचारात घेतलेले आहे.

४. प्रादेशिक कादंबऱ्यांनी गिरविलेले तंत्रविषयक प्रयोगांचाही विचार केला आहे.

५. एक स्वतंत्र वाङ्‌मय प्रवाह म्हणून प्रादेशिक कादंबरीला सभोवतलचे बदलते प्रादेशिक व सामाजिक वास्तव कितपत मानवले, याचाही शोध घेतला आहे.

६. प्रादेशिक कादंबऱ्यांचे सामर्थ्य, मर्यादा व तिच्या भवितव्यासंबंधी काही अटकळ बांधता येतो याचाही मागोवा घेतला आहे.

अशा प्रकारे मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास येथे अभिप्रेत आहे. या अभ्यासाला पुरक म्हणून गणन, वर्गीकरण, प्रकारनिष्ठ, ऐतिहासिक विश्लेषणात्मक, सामाजिक वेगवेगळ्या अभ्यास पध्दतीचा वापर केला आहे.

## ०४. संशोधनाची व्याप्ती –

"मराठीतील निवडक प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास" हा स्थूलमानाने इ.स. २००० पर्यंतच्या प्रादेशिक कादंबऱ्यांपुरता मर्यादित आहे. या अभ्यासासाठी प्रादेशिक वैशिष्ट्यानुसार पुढील पाच विभागातील प्रत्येकी दोन अशा एकूण दहा प्रादेशिक कादंबऱ्या निवडल्या आहेत त्या अशा –

**१) गोमंतक :** (भावीण –बा.भ.बोरकर, आमचे गोयं, आमका जाय –सुभाष भेंडे)

**२) कोकण :** (पडघवली – गो.नी. दांडेकर, इंधन – हमीद दलवाई)

**३) पश्चिम महाराष्ट्र :** (बनगरवाडी – व्यंकटेश माडगुळकर, गोतावळा – आनंद यादव)

**४) विदर्भ :** (धग– उद्धव शेळके, झेलझपाट – मधुकर वाकोडे)

**५) मराठवाडा :** (पाचोळा – रा. रं. बोराडे, विषवृक्षाच्या मुळ्या – वासुदेव मुलाटे)

महाराष्ट्राच्या भौगोलिक परिसीमा विचारात घेऊन वरील दहा निवडक कादंबऱ्या अभ्यासासाठी निवडलेल्या आहे. त्यात लेखकाबरोबर विषयाच्या आणि भौगोलिक परिसराच्याही बाबतीत वेगळेपणा राखण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे प्रादेशिक कादंबऱ्यांचा तौलनिक आढवा घेणे शक्य होते.

*************************